# परभणी शहर महानगरपालिका, परभणी

कार्यालय ~~आरोग्य~~ विधी विभाग

जा.क्र./कावि/~~आरोग्य~~ विधी/ 199 /2024 दिनांक 23 /09 /2024

## आदेश

ज्याअर्थी, मृत्युबाबत आगाऊ निर्देश नसताना, 'जेव्हा एखाद्या व्यक्तीस बरे होण्याची आशा नसते आणि त्याला रुग्णालयाद्वारे जीवन समर्थन प्रणाली/उपचार चालू दि ठेवले जातात, तेव्हा वरील स्थितीत सदर जीवन समर्थन प्रणाली मागे घ्यावी का?" याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी MISCELLANEOUS APPLICATION NO. १६९९ OF २०१९ IN WRTI PETITION (CIVIL) NO. २१५ OF २००५, COMMON CAUSE (A REGD. SOCIETY Petitioner (5) VERSUS UNION OF INDIA Respondent (S) INDIAN SOCIETY OF CRITICAL CARE MEDICINE Applicant या प्रकरणी दिनांक २४.०१.२०२४ रोजी आदेश पारित केलेला आहे.

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या वरील आदेशाच्या अंमलबजावणी करताना, मृत्युबाबत आगाऊ निर्देश दिलेल्या निष्पादित केलेल्या व्यक्तीस त्याच्या सन्मानपूर्वक मृत्यूच्या हक्काचा अपेक्षित हेतू साध्य करण्याकामी या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मा. जिल्हा न्यायाधीशाद्वारे नियुक्त केलेल्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (JMFC) यांनी निष्पादित केलेल्या 'आगाऊ निर्देशाची (Advance Directives)' एक प्रत स्थानिक शासन किंवा महानगरपालिका किंवा नगरपालिका किंवा पंचायत यांच्या सक्षम अधिकाऱ्याकडे जतन करण्यासाठी सुपूर्द करावयाची आहे. उपरोक्त संदर्भात स्थानिक प्रशासन सदर दस्तऐवज जतन करून त्यांच्या संरक्षणामध्ये (Custody) ठेवण्याकरिता सक्षम अधिकाऱ्याची Custodian म्हणून नियुक्ती करेल असे निर्देश आहेत.

ज्याअर्थी, डॉ.कल्पना सावंत, वैद्यकीय अधिकारी, हे परभणी महानगरपालिकेत प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

त्याअर्थी, मी, धैर्यशील जाधव, आयुक्त परभणी शहर महानगरपालिका, महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, वरीलप्रमाणे प्रथम श्रेणी दंडाधिकारी (JMFC) यांच्याकडून प्राप्त होणारे आगाऊ निर्देश **(Advance Directives)** हे दस्तऐवज जतन करण्याकामी **डॉ.कल्पना सावंत, प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी**, यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने, कॉमन कॉज (नोंदणीकृत संस्था) विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या याचिकेमधील दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी संरक्षक (Custodian) म्हणून नामनिर्देशित करत आहे.

23-9-24

(धैर्यशील जाधव)

आयुक्त

परभणी शहर महानगरपालिका, परभणी.

Scanned with OKEN Scanner